किंमत रुपये
मुल्यांकन रुपये
मुद्रांक शुल्क रुपये
नोंदणी फी रुपये
(मुल्यांकन विभाग क्रमांक : ५.४)

श्री

क रा र ना मा

आज दिनांक माहे सन २०१७ इसवी रोज ते दिवशी.

श्री.
वय वर्षे, धंदा :
राहणार :

लिहून घेणार

PAN

यांसी -

मे. ध्रुव डेव्हलपर्स, भागीदारी संस्था
यांचा नोंदणीकृत पत्ता : एफ-६, जोशी संकुल,
गोळे कॉलनी, नाशिक - ४२२ ००२
PAN AAJFD 8854 A तर्फे भागीदार -

१. सौ. डिंपल राजकुमार संचेती,
वय ३३ वर्षे, धंदा : व्यापार,
राहणार : फ्लॅट नंबर २०४, पर्पल ड्रिमसिटी,
आगरटाकळी, नाशिक-४२२ ००६
PAN FIEPS 4708 G

२. श्री. सदानंद रमेशराव देशमुख,
वय ३९ वर्षे, धंदा : व्यापार
राहणार : बी-२१, दुर्गा नगर,
के.के. वाघ कॉलेजच्या मागे, पंचवटी,
नाशिक - ४२२ ००३
PAN AFEPD 0346 P

लिहून देणार

...२/-

यांसी -

१. श्री. मुकुंद भानजी अग्रावत (अग्रवाल),
वय ५९ वर्षे, धंदा : नोकरी,
PAN AANPA 9729 K

२. श्री. अशोक कुमार मादरेचा,
वय ४७ वर्षे, धंदा : व्यापार,
PAN AEUPM 6333 A

३. सौ. जयश्री मुकुंद अग्रावत (अग्रवाल),
वय ४५ वर्षे, धंदा : व्यापार,
PAN AAOPA 2366 H

४. सौ. पुष्पा अशोक मादरेचा,
वय ४५ वर्षे, धंदा : व्यापार,
PAN AAVPM 4685 Q

अ.नं. १ व ३ राहणार : ए/२,
जोस्ट को-ऑप.हौ.सो.रोड नंबर २२,
वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, साठे नगर,
इंदिरा नगर, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४
अ.नं.२ व ४ राहणार : ९२, सन व्ह्यू,
महात्मा फुले नगर नाका, सावरकर नगर,
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०६

संमती देणार

कारणे करारनामा लिहून देतो की,

१) अ) ***संपूर्ण मिळकतीचे वर्णन*** :-तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकीं मौजे **आनंदवल्ली** या गांवचे शिवारातील, नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर ६५/१/१अपै. यातील मंजूर फायनल ले-आऊट मधील बिनशेती प्लॉट नंबर २+३, क्षेत्रफळ ९६२.७० चौरस मिटर्स आहे, या मिळकतीचा सिटी सर्व्हे नंबर ३३८९ व ३३९१ असून याचे सिटी सर्व्हे रेकॉर्डप्रमाणे अनुक्रमे क्षेत्र ६४८.०० चौरस मिटर्स + २९४.०० चौरस मिटर्स = ९४२.०० चौरस मिटर्स आहे, यांसी चतुःसिमा :-

पूर्वेस : याच ले-आऊट मधील प्लॉट नंबर १ व ओपन स्पेसचे क्षेत्र

पश्चिमेस : ९.०० मिटर रुंदीचा कॉलनी रोड

दक्षिणेस : ७.५० मिटर रुंदीचा कॉलनी रोड

उत्तरेस : २४.०० मिटर रुंदीचा डी.पी. रोड

(सदरहू मिळकतीचा पहिल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेला असून यापुढे सदरहू मिळकतीचा "निर्देश प्रकल्पाची" जमीन असा केला आहे)

ब) ***तुम्हांस खरेदी द्यावयाच्या मिळकतीचे वर्णन*** :- वर कलम **अ** यांत वर्णन केलेल्या मिळकतीवर आम्ही **नवश्या इलाईट अपार्टमेंटस** या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. (यापुढे उक्त इमारत असा निर्देश केला आहे). सदरहू इमारतीचे ------- मजल्यावरील रहिवासी फ्लॅट नंबर ------ ची मिळकत यांसी चटई क्षेत्रफळ --------- चौरस मिटर्स आहे, सदरहू फ्लॅटला लागून असलेल्या बाल्कनीचे चटई क्षेत्र ---------- चौरस मिटर्स वापरण्याचे हक्कासह, त्याचप्रमाणे सदरहू फ्लॅटला लागून असलेल्या टेरेसचे चटई क्षेत्र ---------- चौरस मिटर्स वापरण्याचे हक्कासह, तसेच सदरहू फ्लॅटला लागून असलेल्या कपाटाचे चटई क्षेत्र ---------- चौरस मिटर्स वापरण्याचे हक्कासह, यांसी चतु:सिमा :-

पूर्वेस :

पश्चिमेस : मंजूर झालेल्या बिल्डींग प्लॅन प्रमाणे

दक्षिणेस :

उत्तरेस :

येणेप्रमाणे चतु:सिमेंतील फ्लॅटची मिळकत

२अ) वर कलम १-अ यांत वर्णन केलेली मिळकत ही संमती देणार यांच्या मालकीची असून त्यांची नांवे सदरहू मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला व सिटी सर्व्हे रेकॉर्डला दाखल करण्यात आलेली आहेत. वर कलम १-अ यांत वर्णन केलेली मिळकत आम्ही संमती देणार यांचेकडून डेव्हलपमेंटसाठी घेतलेली असून त्याबद्दलचे डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट व जनरल मुखत्यार पत्र संमती देणार यांनी आम्हांस दिनांक ०५/०३/२०१४ रोजी लिहून दिलेले

...४/-

असून सदरचे दोन्ही दस्तऐवज मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-२, नाशिक-१ यांचे कार्यालयांत दस्तऐवज क्रमांक २२५२ व २२५३ अन्वये दिनांक ०५/०३/२०१४ रोजी नोंदविलेले आहेत. तेव्हा पासून आज पावेतो सदरहू मिळकत ही डेव्हलपर्स या नात्याने व हक्काने प्रत्यक्ष आमचे कबजांत, वहिवाटीत व उपभोगांत आहे. सदरच्या डेव्हलपमेंट ॲग्रीमेंटमधील अटी व शर्तींनुसार आम्ही संमती देणार यांना मोबदला अदा करणार आहोत, याची सर्वस्वी जबाबदारी आमचेवर आहे व राहील. सदरहू मिळकती करिता लागणारा ३८५.०० चौरस मिटर्स क्षेत्राचा टीडीआर आम्ही दिनांक ०४/०४/२०१४ रोजी श्री. दिलीप कचरदास संकलेचा व श्री. तुषार विजय संकलेचा यांचेकडून कायम फरोक्त खरेदी घेतलेला असून सदरचे खरेदीखत मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-२ नाशिक-५ यांचे कार्यालयात दस्तऐवज क्रमांक ३२७१ अन्वये दिनांक ०४/०४/२०१४ रोजी नोंदविलेले आहे. आम्ही डेव्हलपर्स या नात्याने व हक्काने सदरहू मिळकतीवर **नवश्या इलाईट अपार्टमेंटस** या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.आम्ही डेव्हलपर्स या नात्याने व हक्काने तुम्हांस वर कलम १-ब यांत वर्णन केलेली बांधीव फ्लॅटची मिळकत कायम फरोक्त खरेदी देणेसाठी हा करारनामा लिहून देत आहोत. संमती देणार यांची या करारनाम्यास संमती असलेबद्दल त्यांनाही या करारनाम्यात संमती देणार सदरी सामिल केले आहे.

२ब) वर कलम १-अ यांत वर्णन केलेली मिळकत ही मंजूर ले-आऊट मधील असून सदर मिळकतीचा फायनल ले-आऊट प्लॅन मे. सहाय्यक संचालक साहेब, नगररचना, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील जा.नं. नगररचना विभाग/अंतिम/सातपुर/३/३८६९ दिनांक २९/१०/२००५ अन्वये मंजूर झालेला आहे.

२क) वर कलम १-अ यांत वर्णन केलेली मिळकत ही मे. जिल्हाधिकारी साहेब, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक : मह/कक्ष-३/बि.शे.प.क्र./४/२३६/२००४ दिनांक ०३/०२/२००५ अन्वये बिनशेतीकडे वर्ग झालेली आहे.

२ड) वर कलम १-अ यांत वर्णन केलेल्या प्लॉट नंबर २ व ३ या दोन्ही प्लॉटसच्या एकत्रिकरणाचा प्लॅन व सदरहू मिळकतीवरील इमारतीचा

बिल्डींग प्लॅन मे. एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर (टाऊन प्लॅनिंग), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील कमेन्समेंट सर्टिफिकेट नंबर एलएनडी /बीपी/सातपुर/बी-१/३४/३८६ दिनांक २१/०४/२०१४ अन्वये मंजूर झालेला आहे. त्यानुसार सदरहू मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला एकत्रिकरणाची नोंद नंबर ९८३४ मंजूर करण्यात आलेली आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले असून सदरहू इमारतीचे कम्प्लीशन सर्टिफिकेट मिळणेसाठी नाशिक महानगरपालिका नाशिक यांना आम्ही अर्ज दिलेला आहे.

३) आम्ही ..... क्रमांक ..... येथे या अधिनियमाअन्वये स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे प्रकल्पाची नोंदणी केली आहे, जोडपत्र "एफ" मध्ये स्वप्रमाणित पत जोडली आहे.

४) आम्ही इमारतीच्या संरचनात्मक आराखडा (संकल्पचित्र) आणि आरेखने तयार करण्यासाठी स्थापत्य अभियंत्याची नेमणूक केली आहे आणि आम्ही इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यन्त वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थापत्य अभियंता यांच्याकडून व्यावसायिक पर्यवेक्षण करण्याचे मान्य केले आहे.

५) आम्हांस मालक या नात्याने व हक्काने सदर प्रकल्पाच्या जमीनीवर बांधकाम करावयाच्या इमारतीतील सदनिक विकण्याचा आणि त्याच्याशी संबंधित विक्रीचा मोबदला मिळविण्या करिता वाटपग्राहीसोबत करार करण्याचा केवळ एकट्याचाच अधिकार आहे.

६) उक्त जमीनीच्या संबंधातील मालकी हक्काची सर्व कागदपत्रे आणि वास्तुशास्त्र श्री. ऋषीकेश के. पवार यांनी तयार केलेले आराखडे, संकल्पचित्रे आणि विनिदर्शके आणि स्थावर मालमत्ता (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ (यापुढे "उक्त अधिनियम" असा निर्देश केला आहे) आणि त्याखाली केलेले नियम व विनियम या अन्वये विनिर्दिष्ट केले असेल, असे प्रकल्पाच्या जमीनीशी संबंधित सर्व दस्तऐवज प्रवर्तकाकडून वाटप ग्राहीने मागणी केलेली आहे आणि प्रवर्तकाने वाटपग्राहीस निरीक्षणासाठी दिलेली आहेत.

७) प्रवर्तकाच्या मालकी हक्काच्या प्रमाणपित्राच्या अधिप्रमाणिक प्रती ज्यावर सदनिकांचे बांधकाम करण्यात आले आहे किंवा बांधकाम करावयाचे आहे, अशा प्रकल्पाच्या जमीनीवरील प्रवर्तकाच्या मालकी हक्काचे स्वरुप दर्शविणारी मालमत्ता पत्रिका म्हणजेच ७/१२ उताऱ्याची अधिप्रमाणित प्रत यासोबत जोडलेली आहे आणि अनुक्रमे जोडपत्र "क" व "ख" म्हणून चिन्हीत केलेला आहे.

८) आणि ज्याअर्थी, प्रवर्तकाने प्रस्तावित केल्याप्रमाणे स्थानिक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या आराखडा नकाशांच्या स्वप्रमाणित प्रती यासोबत जोडण्यात आलेल्या आहेत आणि ते जोडपत्र ग-१ म्हणून चिन्हीत केले आहे.

९) आणि ज्याअर्थी, प्रवर्तकाने प्रस्तावित केल्याप्रमाणे आराखडा नकाशांचा आणि त्यानुसार इमारतींचे बांधकाम आणि उक्त प्रकल्पासाठी द्यावयाच्या प्रस्तावित असलेल्या मोकळया जागा यांच्या स्वप्रमाणित प्रती यासोबत जोडण्यात आलेल्या आहेत आणि ते जोडपत्र ग-२ म्हणून चिन्हीत केले आहे.

१०) आणि ज्याअर्थी, स्थानिक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात आली त्याप्रमाणे वाटपग्रहीद्वारे खरेदी करावयाच्या सदनिकाचे व विनिर्देशके यांच्या स्वप्रमाणित प्रती यासोबत जोडपत्र "घ" मध्ये जोडण्यात आलेल्या आहेत आणि ते "घ" म्हणून चिन्हीत करण्यात आल्या आहेत.

११) आणि ज्याअर्थी, भाग व उक्त इमातीचे नकाशे, विनिर्देश, उन्नयन यांकरिता संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून काही मान्यता मिळविल्या आहेत आणि उक्त इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तो वेळोवेळी विविध प्राधिकरणांकडून शिल्लक मान्यता मिळवील.

१२) आणि ज्याअर्थी, उक्त नकाशे मंजूर करताना, संबंधित स्थानिक प्राधिकरणाने आणि किंवा शासनाने काही अटी, शर्ती विनिर्देश व निर्बंध निर्धारित केले असून प्रकल्पाच्या जमीनीचा व उक्त इमारतीचा विकास करतांना, प्रवर्तकाने त्याचे अनुपालन व पालन करावयाचे आहे आणि त्याचे

यथाचिक अनुपालन व पालन केल्यावरच केवळ संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून उक्त इमारतीच्या संबंधातील बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल.

१३) आणि ज्याअर्थी, प्रर्वकाने पद्नुसार, उक्त प्रस्तावित नकाशांनुसार उक्त इमारतीच्या/इमारतींच्या बांधकामाला सुरुवाल केली आहे.

१४) आणि ज्याअर्थी वाटपग्रहीने उक्त प्रकल्पाच्या टप्पा ------- मध्ये बांधलेल्या इमारतीमधील ------- मजल्यावरील फ्लॅट क्रमांक --- च्या वाटपासाठी प्रवर्तकाकडे अर्ज केला आहे.

१५) आणि ज्याअर्थी, उक्त सदनिकेचे चटई क्षेत्र -------- चौ.मि. इतके आहे, आणि "चटई क्षेत्र" याचा अर्थ बाहेरील भिंतीनी व्यापलेले क्षेत्र, परिसेवा कूपखालील क्षेत्र, केवळ वाटपग्रहीच्या उपयोगाकरिता उक्त सदनिकेला उपांगभूत असलेला, सज्जा (बाल्कनी) किंवा व्हरांडयाचे क्षेत्र आणि केवळ, वाटपग्राहीच्या उपयोगासाठी उक्त सदनिकेस उपांगभूत असलेले खुल्या टेरेसचे क्षेत्र वगळून, नरंतू, सदनिकेच्या अंतर्गत विभाजक भिंतीनी व्यापलेल्या क्षेत्राचा समावेश असलेले सदनिकेचे निव्वळ वापर योग्य चटई क्षेत्र, असा आहे.

१६) आणि ज्याअर्थी, पक्षकार, या करारामध्ये आणि सर्व लागू असणाऱ्या कायद्यामध्ये अंतर्भूत आलेल्या संपूर्ण अटी, शर्ती व करारनिविष्टी यांचे विश्वासपूर्वक पालन होण्यासाठी त्यांची परस्परांची घोषणापत्रे, निवेदने व आश्वासने यांवर विश्वास ठेवून, आता यात यापुढे स्पष्ट करण्यात येणाऱ्या अटी व शर्तींवर स्वेच्छेने हा करार करीत आहोत.

१७) आणि ज्याअर्थी, सदर करार करण्यापूर्वी, वाटपग्रहीने, प्रर्वकाने वाटपग्राहीस विक्री करण्याचे मान्य केलेल्या सदनिकेच्या विक्रीच्या मोबदल्याचे आंशिक प्रदान असणारी रक्कम रुपये ---------- (अक्षरी रुपये ----------) फक्त इतकी रक्कम, आगाऊ रक्कम म्हणून प्रवर्तकास प्रदान केली आहे (रक्कम प्रदान केल्याचे व ती मिळाल्याचे प्रवर्तक याद्वारे मान्य व कबूल करीत आहे) आणि वाटपग्रहीने, यात यापुढे दर्शविलेल्या रितीने विक्रीच्या मोबदल्यापैकी शिल्लक रक्कम प्रदान करण्याचे मान्य केले आहे.

१८) आणि ज्याअर्थी, प्रवर्तकाने ---------- येथील प्राधिकारणाकडे ---------- क्रमांक --------- यासह स्थावर संपदा (विनियम व विकास) अधिनियम, २०१६ याच्या तरतुदींअन्वये प्रकल्पाची नोंदणी केली आहे.

१९) आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये प्रवर्तकाने, वाटपग्राहीसह उक्त सदनिकेची विक्री करण्यासाठी सदर कराराची तथ्ये असणारा लेखी करारनामा करणे आणि नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये उक्त करारनाम्याची नोंदणी करणे आवश्यक आहे.

२०) करारात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार आणि पक्षकार, प्रवर्तक यांनी परस्पर मान्य केल्यानुसार व त्यांच्यातील करारानुसार पक्षकार, प्रवर्तक याद्वारे सदनिका विकण्यास संमत आहेत व वाटपग्राही याद्वारे सदनिका खरेदी करण्यास संमत आहे.

२१) त्याअर्थी आता, सदर करारनामा पुढील गोष्टीस साक्षी असून याद्वारे यातील पक्षकारांमध्ये पुढीलप्रमाणे मान्य करण्यात येत आहे :-

१. प्रवर्तक, संबंधित स्थानिक प्राधिकरणाचे वेळोवेळी मान्य केलेले नकाशे, संकल्पचित्रे व विनिर्देश यांस अनुसरुन, उक्त जमीनीवर ---------- तळघर व तळमजला/स्टील्ट क्षेत्र/---------- पोडियम व ---------- वरील मजले यांच्याशी सुसंगत असलेली उक्त इमारत बांधील.

परंतू असे की, प्रवर्तकाला, कोणत्याही शासनाकीय प्राधिकरणाने किंवा कायद्यातील यथोचित बदलाद्वारे आवश्यक केलेला कोणताही फेरफार किंवा भर खेरील करुन, सदनिका खरेदीदाराच्या सदनिकेवर प्रतिकूल परिणाम होईल असा कोणताही बदल किंवा फेरफार यांच्याबाबतीत वाटपग्राहीची लेखी पूर्वसंमती मिळवावी लागेल.

दिनांकपर्यन्त (प्रवर्तकाद्वारे प्रकल्पाच्या बांधकामाशी व चालू कामाशी संबंधित आकारण्यात येणारे मुल्यावर्धित कर, सेवाकर व उपकर किंवा अन्य कोणतेही तत्सम कराच्या मार्गाने प्रवर्तकाने भरलेले किंवा देय असलेल्या करशी सुसंगत असेले) कर वगळून असेल.

१-इ) एकूण किंमत ही वृध्दि मुक्त, बचत करणारी आणि वेळोवेळी सक्षम प्राधिकरण, स्थानिक मंडळे/शासन यांच्याद्वारे आकारण्यात येतील असे किंवालादलेले आकार आणि किंवा अन्य कोणतेही वाढीव शुल्क हे सक्षम प्राधिकारणाला देय असलेल्या विकास शुल्कामुळे वाढीव देय असलेली वृध्दि/वाढ खेरील करुन आहे. प्रवर्तक, सक्षम प्राधिकरण, इ. द्वारे लादण्यात आलेले विकास शुल्क, किंमत किंवा आकारणी यात झालेल्या वाढीसाठी, वाटपग्रहीला देण्यात येणा-या मागणी पत्रासोबत, लागू असलेली, त्यांच्यावतीने प्रसिध्द झालेले/जारी करण्यात आलेले उक्त अधिसूचना/ आदेश/नियम/विनियम जोडील. ते फक्त नंतरच्या प्रदानाला लागू असेल.

१-फ. प्रवर्तक, त्याच्या स्वेच्छा निर्णयाने, वाटपग्राहीद्वारे प्रदान करावयाच्या समान हप्त्यांचा, प्राबल्य असलेल्या संबंधित हप्त्याच्या कालावधीसाठी दरवर्षी ----% दराने आगाऊ प्रदान करण्यासाठी सूट देण्यास मुभा देईल. प्रवर्तकाने, वाटपग्राहीला, सूट मान्य करण्याची तदतूद आणि सूट देण्याचा असा दर, एकदा मान्य केल्यावर, कोणतीही सुधारणा करण्याच्या/काढून घेण्याचा अधिन असेल.

१-ग) प्रवर्तक, इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वाटपग्राहीला नेमून देण्यात आलेले अंतिम चटई क्षेत्र निश्चित करील आणि चटई क्षेत्रात, काही असल्यास, विविध खर्च मर्यादांच्या तीन टक्के इतक्या खर्च मर्यादेस अधिन राहून, बदलाचा तपशिल सादर करुन सक्षम प्राधिकरणाद्वारे भोगवटा प्रमाणपत्राला मंजूरी देण्यात येईल. चटई क्षेत्रासाठी प्रदान करावयाची एकूण किंमतीची प्रवर्तकाद्वारे निश्चित करण्यात आल्यावर पुन्हा गणना करण्यात येईल. जर निश्चित केलेल्या मर्यादेतील चटई क्षेत्रात कोणतीही घट झाल्यास प्रवर्तक, वाटपग्राहीकडून जादा रक्कम भरण्यात आली होती त्या दिनांकापासून नियमात विनिर्दिष्ट केलेल्या वार्षिक व्याज दराने पंचेचाळीस दिवसांच्या आत, वाटपग्राहीला, प्रदान केलेल्या रक्कमेचा परतावा करील. जर वाटपग्राहीला वाटप करण्यात आलेल्या चटई क्षेत्रात कोणतीही वाढ

झाली तर प्रवर्तक, वाटपग्राहीकडे, रक्कम प्रदान करण्याच्या योजनेच्या पुढील टप्प्यानुसार अतिरिक्त रक्कमेची मागणी करील, हे सत्र द्रव्यविषयक समायोजने, या करारातील खंड १(अ) मध्ये मान्य केल्याप्रमाणे प्रती चौरस मीटर, त्याच दराने करण्यात येईल.

१-ह. वाटपग्राही, प्रवर्तकाला त्याच्या स्वेच्छा-निर्णयानुसार योग्य वाटत असेल त्यानुसार, त्याच्या/तिच्या नावे काही असल्यास, कायदेशरी अदत्त रक्कमेनुनसार देय असलेल्या थकीत रक्कमेच्या कोणत्याही शीर्षाखाली त्याच्या/तिच्याद्वारे करण्यात आलेल्या सर्व प्रदानाचे समायोजन/विनियोजन करण्यास प्रवर्तकाला प्राधिकृत करील व वाटपग्राही कोणत्याही रितीने त्याने केलेल्या प्रदानाचे समायोजन करण्यास प्रवर्तक हरकत घेणे /मागणी करणे/निदेश देणे असे न करण्याची हमी घेईल.

टीप :- उपखंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक हप्त्यांची पुढे बहुमजली इमारत असल्यास त्यातील, तळघर/पोडीयम/मजले यांच्या संस्थेशी जोडलेल्या बहुविध हप्त्यांमध्ये पोट विभागणी करण्यात येईल.

२.१ प्रवर्तक याद्वारे उक्त नकाशा मंजूर करतेवेळी किंवा त्यानंतर संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून लादण्यात येतील अशा कोणत्याही असल्यास, सर्व अटी, शर्ती, विनिर्देश आणि निर्बंध यांचे अनुपालन करण्याचे ते पार पाडण्याचे त्यांचे पालन करण्याचे आणि वाटपग्राही व्यक्तीला सदनिकेचा ताबा सोपविण्यापूर्वी, सदनिकेच्या संधित स्थानिक प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र आणि/किंवा पूर्तता प्रमाणपत्र मिळवून देण्याचे मान्य करीत आहे.

२.२ मुदत हे प्रवर्तक तसेच वाटपग्राही व्यक्तीचे मूलतत्व आहे. प्रवर्तक, प्रकल्प पूर्ण करण्याकरिता आणि वाटपग्राही व्यक्तीस सदनिका आणि भोगवटा प्रमाणपत्र किंवा पूर्तता प्रमाणपत्र किंवा यथास्थिती, दोन्ही प्राप्त झाल्यानंतर, वाटपग्राही व्यक्तींच्या संघाला सामाईक क्षेत्रे सोपविण्यासाठी आखून दिलेल्या वेळापत्रकास बांधील असेल. त्याचप्रमाणे, वाटपग्राही व्यक्ती, हप्त्याचे आणि यात यापुढील खंड (१)(क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचेवेळी प्रवर्तकाकडून बांधकाम पूर्ततेच्या अधीन राहून, कराराअन्वये त्याला किंवा तिला देय असणा-या इमर रकमांचे वेळेवर प्रदान करील आणि इतर आबंधने भागवील. ("प्रदानार्थ योजना")

३. प्रवर्तक याद्वारे घोषित करीत आहे की, प्रकल्पाच्या जमीनीच्या संबंधात आज पर्यन्तचे उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांक हे केवळ --------- चौरस मिटर्स आहे आणि प्रवर्तक, अधिमूल्याचे प्रदान केल्यावर उपलब्ध ---------- विकास हक्काच्या हस्तांतरणाचा किंवा चटई क्षेत्र निर्देशांकाचा लाभ उठवून चटई क्षेत्र निर्देशांकाचा किंवा विकास नियंत्रण नियमावलीमध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे विविध योजना राबवून प्रोत्साहनपर चटई क्षेत्र निर्देशांक म्हणून उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांकाचा किंवा उक्त प्रकल्पाला लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलींच्या फेरबदलावर भविष्यात उपलब्ध असलेल्या अपेक्षित वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकावर आधरित वापर करण्याचे नियोजन करीत आहे. प्रवर्तक, उक्त प्रकल्पामध्ये प्रकल्पाच्या जमीनीवर त्याच्याकडून वापरावयाचा प्रस्तावित केलेला ------- चटई क्षेत्र निर्देशांक उघड करीत आहे. आणि वाटपग्राही व्यक्ती, प्रस्तावित बांधकामावर आधरित उक्त सदनिकेची खरेदी करण्याचे आणि प्रस्तावित चटई क्षेत्र निर्देशांकाचा वापर करुन आणि घोषित प्रस्तावित चटई क्षेत्र निर्देशांक हा केवळ प्रवर्तकाचा आहे असे समजून प्रवर्तकाकडून करावयाच्या सदनिकांची विक्री करण्याचे मान्य करीत आहे.

४.१ जर प्रवर्तकाने प्रकल्प पूर्ण करण्याच्या वेळापत्रकाचे पालन कण्यास आणि वाटपग्राहीला सदनिका स्वाधीन कण्यास कसूर केली असेल तर, प्रकल्प रद्द करु इच्छित नसलेला प्रवर्तक, वाटपग्राहीस वाटपग्राहीने दिलेल्या संपूर्ण रक्कमांवर विलंबाच्या प्रत्येक महिन्यासाठी नियमात विनिर्दिष्ट व्याज, ताबा देण्यात येईलपर्यन्त देण्याचे मान्य करील. या कराराच्या अटींनुसार प्रवर्तकास वाटपग्राहीकडून देय होणाऱ्या सर्व प्रलंबिल प्रदानांवर, उक्त रक्कम वाटपग्राहीकडून प्रवर्तकास देय झाली असेल त्या दिनांकापासून नियमात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रवर्तकाला व्याज देण्याचे वाटपग्राही माय करील.

४.२ वरील उपखंड (४.१) च्या बाबतीत, आकारावयाच्या व्याजाच्या प्रवर्तकाच्या हक्कास बाध न आणता, या करारान्वये (संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून आकारण्यात येणाऱ्या करांचा त्याचा/तिचा प्रमाणशीर हिस्सा आणि इतर जावक रक्कमा यांसह) वाटपग्राही व्यक्तीकडून प्रवर्तकाला देय व प्रदेय असलेली कोणतीही रक्कम देय दिनांकास प्रादन करण्यास कसूर करणाऱ्या वाटपग्राही व्यक्ती संबंधीचा आणि तीन हप्त्याचे प्रदान करण्यास

कसूर करणाऱ्या वाटपग्राही व्क्तीसंबंधीचा, प्रवर्तक हा करार स्वत:च्या मताने समान्य करील.

परंतू, प्रवर्तक, हा करार समान्त करण्याचा त्याचा उद्देश, असल्याची आणि करार समाप्त करण्याच्या उद्देशाच्या संबंधातील विवक्षित अटी व शर्तींचा भंग किंवा विवक्षित अटी व शर्तींचा भंग वाटपग्राही व्यक्तीने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत पोहोच देय डाकेने आणि ई-मेल पत्यावर ई-मेलद्वारे वाटपग्राही व्यक्तीला लेखी नोटीस पंधरा दिवसांच्या आत देईल. जर वाटपग्राही व्यक्ती, नोटीसीच्या कालवधीत प्रवर्तकाने नमूद केलेला किंवा केलेले भंग दूर करयास करील करील तर, उक्त नोटीसीच्या कालावधीच्या शेवटी मात्र, प्रवर्तक हा करार समाप्त करण्यास हक्कदार असेल आणि हा करार समाप्त झाल्यावर, प्रवर्तकास, त्यास योग्य वाटेल अशा संपूर्ण स्वेच्छानिर्णयाने सदनिकेचा विनियोग करयाचे व अशा व्यक्तीस व अशा किंमतीला सदनिकेची विक्री करण्याची स्वातंत्र्य असेल.

परंतू आणखी असे की, उपरोक्तप्रमाणे हा करार समाप्त झाल्यावर, प्रवर्तक, वाटपग्राही व्यक्तीस (कोणत्याही कबूल केलेल्या परिसमापन हानीच्या किंवा प्रर्वकास देय असणाऱ्या अन्य कोणत्याह रककमेच्या समायोजनेस व वसुलीस अधीन राहून) समाप्तीच्या ३० दिवसांच्या कालावधीत, वाटपग्राही व्यक्तीने प्रवर्तकाला आतापर्यन्त दिलेल्या सदनिकेच्या विक्रीच्या मोबदल्याच्या हप्त्यांच्या रक्कमेचा परतावा करील. मात्र प्रवर्तक, अशा प्रकारे केलेल्या परताव्याच्या रकमेवर वाटपग्राही व्यक्तीस कोणतेही व्याज देण्यास जबाबदार असणार नाही.

५. प्रवर्तकाने उक्त इमारतीस व सदनिकेमध्ये पुरावयाच्या संबंधातील खिळण्या व जोडण्या आणि नाममुद्रा किंवा किंमतीची मर्यादा (बिगर नाममुद्रित असल्यास) त्यांच्या तपशिलासह एक किंवा अधिक उद्वाहने यांसारख्या सोयीसुविधा योसोबत जोडलेल्या जोडपत्र "ड" मध्ये निर्दिष्ट केलेल्या आहेत.

६. प्रवर्तक, वाटपग्राही व्यक्तीला दिनांक ३१/डिसेंबर/२०१७ रोजी किंवा त्यापूर्वी सदनिकेचा ताबा देईल, जर प्रवर्तक आणि त्याचा अभिकर्ता उपरोक्त दिनांकापर्यन्त त्याच्या आवाक्याबाहेरील कारणामुळे वाटपग्राही व्यक्तीस सदनिकेचा ताबा देण्यास कसूर करील असेल किंवा हयगय करीत

असेल तर, प्रवर्तकाने रक्कम मिळाल्याच्या दिनांकापासून व त्यावरील व्याजाची परतफेड करण्याच्या दिनांकपर्यन्त यातील वरील खंड ४.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याच व्याजदराने, प्रवर्तक, सदनिकेच्या संबंधात वाटपग्राही व्यक्तीकडून अगोदरच मिळालेल्या रकमेचा मागणीवरुन परतावा करण्यास जबाबदार असेल.

परंतु, प्रवर्तक ज्या इमारतीमध्ये सदनिका असेल त इमारत पूर्ण होण्यास जर -

(एक) युध्द, नागरी विक्षोभ किंवा दैवी कृती

(दोन) शासनाची आणि/किंवा इतर सार्वजनिक अथवा सक्षम प्राधिकरणाची कोणतीही नोटीस, आदेश, नियम, अधिसूचना, या कारणांमुळे विलंब होत असेल तर, उपरोक्त तारखेस, सदनिकेचा ताबा देण्यासाठी वाजवी मुदतवाढ मिळण्यास हक्कदार असेल.

७.१ ताबा घेण्यासाठी कार्यपध्दती :- प्रवर्तक, सक्षम प्राकिारणाकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यावर, आणि करारानुसार वाटपग्राहीने केलेल्या प्रदानानुसार अशी नोटीस दिल्याच्या दिनांकापासून ३(तीन) महिन्यांच्या आत करावयाच्या या करारनाम्याच्या अटीनुसार, वाटपग्राहीला सदनिकेचा ताबा लेखी स्वरुपात देऊ करील आणि प्रवर्तक, वाटपग्राहीला सदनिकेचा ताबा देईल. प्रवर्तक, त्यांच्या वतीने, कोणत्याही तरतुदींची, औपचारिक बाबीची, कागदपत्रांची, पूर्तता करण्यात कसूर झाल्यास वाटपग्राहीची क्षतिपुर्ती करण्याचे मान्य करीत आहे व हमी देत आहे. वाटपग्राही, प्रवर्तकाने किवा यथास्थित, वाटपग्राहीच्या संघाने निर्धारित केलेले देखभाल खर्च प्रदान करण्याचे मान्य करीत आहे (आहेत). प्रवर्तक, प्रकल्पाचे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत, त्याच्या वतीने, वाटपग्राहीला लेखी स्वरुपात ताबा देऊ करील.

७.२ वाटपग्राही, प्रवर्तकाने, उक्त सदनिका वापरासाठी व भोगवटा करयासाठी तयार आहेत असे कळविणारी नोटीस वाटपग्राहीला दिल्यापासून १५ दिवसांच्या आत, सदनिकेचा ताबा घेईल.

७.३ सदनिकेचा ताबा घेण्यात वाटपग्राहीने कसूर करणे : खंड ८.१ नुसार, प्रवर्तकाकडून लेखी सूचना प्राप्त झाल्यावर, वाटपग्राही, या

करारनाम्यात विहित केल्याप्रमाणे आवश्यक ती क्षतिपुर्ती, हमी व असे अन्य दस्ताऐवज करुन दिल्यावर प्रवर्तकाकडून सदनिकेचा ताबा घेईल आणि प्रवर्तक, वाटपग्राहीला सदनिकेचा ताबा देईल. जर वाटपग्राहीने खंड ८.१ मध्ये तरतूद केलेल मुदतीत ताबा घेण्यात कसूर केल्यास, असा वाटपग्राही, लागू असेल त्याप्रमाणे देखभाल खर्च प्रदान करण्यास नियमितपणे पात्र असेल.

७.४ जर वाटपग्राहीला सदनिकेचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीत, सदनिकेमध्ये किंवा ज्या इमारतीत सदनिका आहे त्या इमारतीमध्ये किंवा त्यामध्ये वापरलेल्या साहित्यामध्ये कोणताही बांधकाम दोघ असल्याचे कारागिरी, दर्जा किंवा सेवेची तरतूद त्याने, प्रवर्तकाच्या निदर्शनास आणून दिले असेल तर, जेथे शक्य असेल तेथे, प्रवर्तकाकडून त्याच्या स्वत:च्या खर्चाने असे दोघ दूर करण्यात येतील आणि असे दोष दूर करणे शक्य नसेल त्याबाबतीत, वाटपग्राही अधिनियमाअन्वये तरतूद केलेल्या रितीने अशा दोषाद्दल प्रवर्तकाकडून नुकसानभरपाई मिळविण्यास पात्र असेल. जर इमारतीमध्ये कोणत्याही दोषांच्या किंवा वापरलेल्या साहित्याच्या संबंधात एखादा विवाद असेल तर, हे प्रकरण, ताबा सुपुर्द केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीत, नियामक प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल अशी फी प्रदान केल्यावर, स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ याच्या कलम ७२ अन्वये नियुक्त केलेल्या अभिनिर्णय अधिकाऱ्याकडे, निर्णयार्थ सोपविण्यात येईल.

८. वाटपग्राही, निवास याच प्रयोजनासाठी केवळ सदनिकेचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा वापर करील अथवा त्याचा वापर करण्यास परवानगी देईल. वाटपग्राही, त्याची मालकी असलेले वाहन ठेवण्याच्या किंवा उभे करण्याच्या प्रयोजनासाठीच केवळ वाहनतळाच्या जागेचा वापर करील.

९. वाटपग्राही, इमारतीमधील सदनिकांच्या इतर वाटपग्राहीसह (वाटपग्राहंसह) प्रवर्तक ठरवील अशा नावाने ओळखली जाणारी संस्था किंवा मर्यादित कंपनी स्थापन करण्यामध्ये व तिची नोंदणी करण्यामध्ये सहभागी होईल आणि या प्रयोनार्थ, प्रस्तावित संस्थेच्या उपविधिंसह नोंदणी

किंवा आणि/किंवा सदस्यत्वासाठीचा अर्ज आणि संस्था किंवा मर्यादित कंपनी स्थापर करण्यासाठी व तिची नोंदणी करण्यासाठी आणि सदस्य बनविण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे व दस्तऐवज यांवर वेळोवेळी सही करील व ते करुन देईल आणि प्रवर्तकाला वाटपग्राहीच्या सामाईक संघाची नोंदणी करणे शक्य व्हावे म्हणून, प्रवर्तकाने वाटपग्राहीस दस्तऐवज पाठविल्यापासून सात दिवसांच्या आत ते यथोचितरित्या भरील, त्यावर सही करील आणि ते प्रवर्तकाकडे परत पाठवील. यथास्थिती सहकारी संस्था किंवा कंपनीचा निबंधक किंवा अन्य कोणताही सक्षम प्राधिकारी याद्वारे आवश्यक असेल त्याप्रमाणे, उपविधिंचा मसूदा किंवा ज्ञापन आणि/किंवा संस्थापन नियमावरली यामध्ये जर कोणतेही बदल किंवा फेरबदल केले असतील तर वाटपाग्राही कोणतीही हरकत घेणार नाही.

९.१ प्रवर्तक, संस्था किंवा मर्यादित कंपनीच्या नोंदणीपासून तीन महिन्यांच्या आत, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, ज्यात उक्त संरचनेतील, विक्रेता/ पट्टादार/मूळ मालक प्रवर्तक किंवा मालक यांचे सर्व अधिकार, हक्क हे हितसंबंध संस्था किंवा मर्यादित कंपनीकडे हस्तांतरित करील.

९.२ प्रवर्तक, संस्था किंवा मर्यादित कंपनीचा संघ, शिखर संस्था यांच्या नोंदणीपासून तीन महिन्यांच्या आत, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, ज्यात जमीनीवर बहुविध विभाग किंवा इमारती बांधल्या आहेत अशा प्रकल्पाच्या जमीनीचे विक्रेता/पट्टादार/मूळ मालक प्रवर्तक आणि/किंवा मालक यांचे सर्व अधिकार, हक्क संघ/शिखर संस्था यांच्याकडे हस्तांतरित करील.

९.३ सदनिका वापरण्यासाठी किंवा तिचा ताबा घेण्यासठी किंवा तयार आहे अशा प्रवर्तकाकडून वाटपाग्रहीस देण्यात आलेल्या लेखी नोटीसीनंतर १५ दिवसांच्या आत, वाटपाग्राही, प्रकल्पाची जमीन व इमारत/ इमारती या संबंधातील स्थानिक कर, सुधार शुल्क किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाद्वारे करावयाची अशी इतर वसुली आणि/किंवा शासकीय पाणी शुलक, वीमा, सामाईक प्रकाश व्यवस्था दुरुस्ती आणि देयक वसूल करणाऱ्या व्यक्तींचे वेतन, चौकीदार, सफाईगार यांचे वेतन आणि इतर सर्व आवश्यक खर्च आणि प्रकल्पांच्या जमीन आणि इमारत/इारती यांच्या व्यवस्थापन व परिरक्षणाचा अनुषंगीक खर्च यासंबंधात खर्चाच्या प्रमाणातील हिस्सा (अर्थात सदनिकाच्या तळक्षेत्राचा प्रमाणात) प्रदान करण्यास पात्र असेल. संस्था

किंवा मर्यादित कंपनी स्थापन होईपर्यन्त व इमारतीचे संरचना त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यापर्यन्त वाटपग्राही, निर्धारित केल्याप्रमाणे देयकांचा प्रमाणातील हिस्सा प्रवर्तकाला प्रदान करीन, वाटपाग्राही यासाठीची सहमत असेल की, वाटपाग्राहीचा निर्धारित करण्यात आलेला हिस्सा या देयाकांसाठी प्रवर्तकाला, तात्पुरते मासिक अंशदान रुपये ------- प्रदान करील. वाटपाग्राहीने प्रवर्तकाला प्रदान केलेल्या रकमेवर कोणतेही व्याज असणार नाही व प्रवर्तक उपरोक्त संस्था किंवा मर्यादित कंपनीच्या वतीने निष्पादित केलेल्या इमारत किंवा तिचा भाग यांच्या संरेचनेचे अभिहस्तांतरण/ भाडेपट्टयाच्या इमारती किंवा तिच्या भागाच्या संसरनेकरिता निष्पादित केलेले असे अभिहस्तांतरण/अभिहस्तांतरणा वरील उपरोक्त ठेवी (यासाठी या करारात कमी व जातीची तरतूद केली आहे) संस्था किंवा यथास्थिति मर्यादित कंपनीच्या प्रवर्तकाला प्रदान करण्यात येईल.

१०. वाटपाग्राही उक्त जागेचा कब्जा मिळाल्यावर किंवा मिळण्या अगोदर प्रवर्तकाकडे पुढील रक्कम ठेवील :-

(एक) संस्था किंवा मर्यादित कंपनी/संघ/शिखर संस्था यांचे आवेदनपत्र प्रवेश शुल्क हिसा रकमेसाठी रुपये ----------

(दोन) संस्था किंवा मर्यादित कंपनी/संघ/शिखर संस्था यांची स्थापना आणि नोंदणीसाठी रुपये ----------

(तीन) संस्था किंवा मर्यादित कंपनी/संघ/शिखर संस्था यांच्या संबंधात कर व इतर शुल्क/वसुली यांच्या प्रमाणातील हिश्यासाठी रुपये --------

(चार) संस्था किंवा मर्यादित कंपनीच्या/महासंघाच्या/शिखर संस्थेच्या खर्चाकरिता तात्पुरत्या मासिकं अंशदानापोटी जमा करावयाची रक्क रुपये --------

(पाच) पाणी, विद्युत आणि इतर उपयुक्त सुविधा व सेवा जोडणीपोटी जमा करवयाची रक्कम रुपये --------
आणि

(सहा) अभिन्यासामध्ये तरतूद केलल्या विद्यात ग्रहण व उपकेंद्र यांच्या ठेवीवरील रुपये --------

११. उक्त संस्थेच्या किंवा मर्यादित कंपनीच्या किंवा शिखर संस्थेच्या किंवा संघाच्या संरचना करण्याच्या संबंधात आणि तिचे नियम, विनियम व उपविधी तयार करण्यासाठी आणि भाडेपट्याचे अभिहस्तांतरण किंवा अभिहस्तांकन करण्याचा व नकला तयार करण्याचा खर्च यांकरिता न्यायवादी/ अधिवक्ता यांच्या व्यावसायिक खर्चासह सर्व कायदेशरी खर्च, आकार, व्याय भागविण्यासाठी वाटपग्राही प्रवर्तकाला रुपये ---------- इतकी रक्कम प्रदान करील.

१२. इमारतीच्या संरचनेच्या किंवा इमारतीच्या भागाची अभिहस्तांतरण पत्राची नोंदणी करतेवेळी, उक्त इमारतीच्या भागाच्या संसरेचेच्या बाबतीत अशा अभिहस्तांतरणावर किंवा अभिहस्तांतरणाच्या कोणत्याही दतऐवजावर किंवा विलेखावर उक्त संस्थेने किंवा मर्यादित कंपनीने प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काचा व नोंदणी आकाराचा वाटपाग्रहीचा हिस्सा, वाटपाग्राही प्रवर्तकाला प्रदान करील. प्रकल्पाच्या जमीनीच्या अभिहस्तांतरण पत्राची नोंदणी करतेवेळी, शिखर संस्था किंवा संघाच्या नावे करुन द्यावयाच्या उक्त जमीनीच्या संरचनेच्या बाबतीत अशा अभिहस्तांतरण पत्रावर अथवा हस्तांतरणाच्या कोणत्याही दस्तऐवजावर किंवा विलेखावर उक्त शिखर संस्थेने किंवा संघाने प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काचा व नोंदणी आकाराचा वाटपग्राहीचा हिस्सा, वाटपाग्राही, प्रवर्तकाला प्रदान करील.

१३. प्रवर्तकाचे प्रतिनिधित्व आणि आश्वासने :-

प्रवर्तक याद्वारे पुढीलप्रमाणे वाटपाग्रहीचे प्रतिनिधित्व करीत आहे आणि आश्वासन देत आहे :-

(एक) प्रवर्तकाकडे या करारनाम्यास जोडेल्या मालकी हक्क अहवालामध्ये घोषित केल्याप्रमाणे प्रकल्पाच्या जमीनीच्या बाबतीत स्पष्ट व विक्रीयोग्य मालकी हक्क आहे आणि प्रकल्पाच्या जमीनीवर विकासकामे करण्याचे आवश्यक हक्क आहेत आणि प्रकल्पाच्या अंमलबावणीकरीता प्रकल्पाच्या जमीनीचा वास्तविक, प्रत्यक्ष व कायदेशीर कब्जा देखील आहे.

(दोन) प्रवर्तकाकडे प्रकल्पाचा विकास करण्याचा कायदेशीर हक्क आहे आणि सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक त्या मान्यता घेतलेल्या आहेत आणि प्रकल्पाच्या विकास करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडून वेळोवेळी आवश्यक त्या मान्यता घेईल.

(तीन) मालकी हक्क अहवालामध्ये प्रकट केलेल्या भाराव्यतिरिक्त प्रकल्पाच्या जमीनीवर अथवा प्रकल्पावर कोणताही भार नाही.

(चार) मालकी हक्क अहवालात प्रकट केलेल्या व्यतिरिक्त प्रकल्पाच्या जमीनीच्या किंवा प्रकल्पाच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयात कोताही वाद प्रलंबिल नाही.

(पाच) प्रकल्पाच्या, प्रकल्प जमीनीच्या आणि उक्त इमारतीच्या बाबतीत सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या सर्व मान्यता, लायसने व पवाने वैध आणि विद्यमान आहेत. कायद्याची रीतसर प्रक्रिया अनुसरुन ते मिळविण्यात आले आहेत. याशिवाय प्रकल्पाच्या जमीनीच्या आाि उक्त जमीनीच्या व उक्त इमारतीच्या/भागाच्या बाबतीत सक्षम प्राधिकरणाने द्ावयाच्या सर्व मान्यता, लायसने व परवाने कायद्याची रितसर प्रकिया अनुसरुन मिळविले जातील आणि प्रकल्पाच्या, प्रकल्प जमीनीच्या इमारतीच्या व सामाईक क्ष्ज्ञेत्राच्या संबंधात सदैव लागू असलेल्या सर्व कायद्यांचे पालन केले जाईल.

